# 2 भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये: BASIC FEATURES OF INDIAN ECONOMY

BY

DR. SMT. RAJANI V. SONTAKKE

ASSOCIATE PROFESSOR

# भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

1. दरडोई उत्पन्न कमी ( Low Per Capita Income)
2. आर्थिक असमानता. (Income Inequality)
3. दारिद्र्याचे प्रमाण जास्त( High Incidence of Poverty)
4. आर्थिक अवलंबित्व (Economic Dependence)
5. प्राथमिक क्षेत्राचे अर्थव्यवस्थेत प्रमुख स्थान (Priority of Primary Sector)
6. अर्थव्यवस्थेवर वाढत्या लोकसंख्येचा दबाव
7. बेरोजगारी व अपूर्ण रोजगार

# वैशिष्ट्ये

8. भांवलाची कमतरता

9. निम्न प्रतीचे मानवी भांडवल

10. निम्न स्तरीय तांत्रिक ज्ञान

11. अकार्यक्षम संघटना

12. भारतीयांचे निम्न दर्जाचे राहणीमान

13. मानवी कल्याणाचा निम्न स्तर

# 1. दरडोई उत्पन्न कमी : LOW PER CAPITA INCOME

- दरडोई उत्पन्न कमी असणे हे अल्पविकसीत देशाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.
- भारताचे दरडोई उत्पन्न अत्यंत कमी आहे.
- 1999 मध्ये भारतातील दरडोई उत्पन्न 450 डॉलर्स इतके होते.
- ह्याच वेळी स्वित्झर्लंडचे भारताच्या दरडोई उत्पन्नपेक्षा 85 पट जास्त होते तर अमेरिकेचे 36 पट जास्त होते.
- विकसित अर्थव्यवस्था ह्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या मानाने जास्त वेगाने प्रगती करीत आहेत.

## तालिका  दरडोई उत्पन्न (डॉलर मध्ये) 2008

| विकसित देशाचे नाव | दरडोई उत्पन्न | अल्पविकसी त देशाचे नाव | दरडोई उत्पन्न |
|---|---|---|---|
| अमेरिका | 47580 | मेक्सिको | 9980 |
| इंग्लंड | 45390 | ब्राझील | 7350 |
| जर्मनी | 42440 | चीन | 2940 |
| फ्रान्स | 42250 | थायलंड | 2840 |
| ऑस्ट्रेलिया | 40350 | इंडोनेशिया | 2010 |
| जपान | 38210 | **भारत** | **1070** |
| इटली | 35240 | पाकिस्तान | 980 |
| स्पेन | 31960 | बांग्लादेश | 520 |
| | | इथिओपिया | 280 |

स्तोत्र: World Bank, World Development Report, 2010, Table 1, pp 378, 79

# 2. प्राथमिक क्षेत्राचे अर्थव्यवस्थेत प्रमुख स्थान

- भारतात एकूण श्रमिकांच्या 70% श्रमिक प्राथमिक क्षेत्रात काम करतात जसे- शेती, जंगले, खाणकाम, मच्छीमार इ.
- भारतात2000 मध्ये कामकरी लोकसंख्येच्या 57 % हिस्सा शेतीवर अवलंबून होता.
- राष्ट्रीय उत्पन्नात शेती उत्पन्नचा जवळपास  27 % हिस्सा होता.
- विकसित देशात 10 % पेक्षा कमी श्रमिक काम करताना दिसतात.
- अमेरिकेत एकूण श्रमिकांपैकी फक्त 4 % श्रमिक शेती क्षेत्रात काम करतात.
- अमेरिका अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णच नाही तर मोठा निर्यातक आहे.

# 3. भारताच्या अर्थव्यवस्थेवर वाढत्या लोकसंख्येचा दबाव

- भारताचा एकूण लोकसंख्या वाढीचा वेग वार्षिक सुमारे 2.5 % आहे.
- भारताची एकूण लोकसंख्या 1951 मध्ये 36.1 कोटी होती ती 1991 पर्यंत 85 कोटी पर्यंत वाढली.
- वाढते उत्पादन वाढत्या लोकसंख्येचे पोट भरण्यात खर्च होत आहे.
- उत्पादन जरी वाढत असले तरी लोकसंख्येच्या दृष्टीने ते कमी पडत आहे.
- त्यामुळे भारतातील बहुसंख्य लोकांचे जीवनमान खालच्या पातळीचे आहे.

# 4. बेरोजगारी व अपूर्ण रोजगार

- भारतात लोकसंख्या वाढीचा दर फार जास्त असल्यामुळे श्रमाचा पुरवठा सुध्दा फार जास्त आहे.
- वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्न कमी होत जाते.
- बचत व गुंतवणूकीचा दर कमी असतो.
- अर्थव्यवस्थेत गुंतवणूक हा घटक आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असतो.
- भारतीय गुंतवणुकीचा दर अत्यन्त कमी असल्याने।99। पर्यंत प्रचंड प्रमाणावर बेरोजगारी व अर्धरोजगरी सातत्याने दिसून येते.
- भारतात छुपी व प्रच्छन्न बेरोजगारी मोठया प्रमाणावर दिसून येते.

# 5. भांडवलाची कमतरता

- भांडवलाचा अभाव हे भारतीय अर्थव्यवस्था अल्पविकसीत असण्याचे एक प्रमुख कारण आहे.
- भांडवल हा आर्थिक विकासाचा महत्वपूर्ण घटक आहे.
- भारतात असलेले दरडोई भांडवल फार कमी आहे.
- औद्योगिक व सेवा क्षेत्रातही भांडवलाच्या  टंचाईची परिस्थिती आहे.

# 6. निम्नप्रतिचे मानवी भांडवल

- भारतात मानवी साधनांची गुणवत्ता निम्न प्रतीची आहे.
- आरोग्य, शिक्षण, सामाजिक सुरक्षा, सामाजिक सेवा, व समाज कल्याण ह्यावर करण्यात येणार खर्च| मानवी संसाधनावर केलेला खर्च होय.
- अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी मानवी भांडवल उच्च प्रतीचे असणे आवश्यक आहे.
- जपान सारख्या देशाने नैसर्गिक साधन सामुग्रीची तीव्र टंचाई असून देखील औद्योगिक कच्चा मालाची आयात करून औद्योगिक व राष्ट्रीय उत्पन्नात अमेरिकेपेक्षाही अधिक प्रगतीचा टप्पा केवळ उच्च प्रतीच्या मानवी भांडवलामुळे गाठला आहे.
- भारतातील मानवी भांडवल शारिरीक व बौद्धिक दृष्टया निम्न प्रतीचे आहे, कारण निरक्षरता, अंधश्रध्दा, दैवावर विसंबुन राहणे , भौतिक सुखसाधनाकडे पाठ फिरविणे इ. गोष्टी दिसून येतात.

# 7. निम्नस्तरीय तांत्रिक ज्ञान

- भारतात विविध क्षेत्रात वापरण्यात येणारे तंत्रज्ञान हे मागासलेले आहे.
- त्यामुळे संसाधनांमध्ये अकार्यक्षमता दिसून येते व उत्पादनाचे व उत्पादकतेचे प्रमाणही कमी दिसून येते.
- भांडवलाची कमतरता, निरक्षरता, आधुनिक तंत्रविज्ञान न वापरण्याची प्रवृत्ती इ. मुळे नैसर्गिक व मानवी साधन समुग्रीचा कार्यक्षम वापर होत नाही .
- स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने बरीच प्रगती केली असली तरी बहुसंख्य श्रमिक विविध आर्थिक क्षेत्रात वापरत असलेले तंत्रज्ञान व उत्पादन पद्धती जुनाट व परंपरागतच आहेत.

# 8. अकार्यक्षम संगठन:

- एखाद्या देशाच्या विकासाकरिता बँक, सहकारी सोसायट्या, भागीदारी संस्था, जॉईंट स्टॉक कम्पन्या , कॉर्पोरेशन किंवा निगम इ.संगठनात्मक प्रकारांची आवश्यकता असते.
- वित्तीय साधन सामुग्री गोळा करणाऱ्या बहुसंख्य शेतकऱ्यांना निरनिराळ्या प्रकारचे कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था स्वातंत्र्योत्तर काळातही पुरेशा संख्येने दिसून येत नाही.
- हीच स्थिती शेतकऱ्यांच्या धान्य विक्रीच्या सहकारी व इतर संस्थांच्या बाबतीत अजूनही मोठ्या प्रमाणावर दिसून येते.
- ह्याच कारणामुळे सावकार सारख्या मध्ययुगीन संस्था दीर्घकाळ अस्तित्वात होत्या, त्याचा अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाला.

# 9. भारतीयांचे निम्न दर्जाचे राहणीमान:

- विकसित देशांमध्ये सरासरी कॅलरी व प्रोटीन ह्यांचा आहारातील वापर3400 पेक्षा अधिक तर भारतात केवळ2415 आहे.
- जीवनाकरिता कमीतकमी 2100 कॅलरी ची आवश्यकता असते.
- भारतात अजूनही 23.36 % जनता दारिद्र्य रेषेखाली राहते.त्यामुळे त्यांना 2100 कॅलरीज आहारातून मिळत नाहीत,
- विकसित देशांपेक्षा भारतात प्रोटीन उपभोग ही निम्म्याहून कमीच आहे.

# 10. मानवी कल्याणाचा निम्न स्तर

- सामान्यपणे एका व्यक्तीच्या कल्याणाचे मापन करण्यासाठी तीन मापदंडांचा उपयोग केला जातो.1) त्याचे चालू आणि समभावीत उत्पन्न, 2,) त्याचे आरोग्य आणि 3) शिक्षणाची उपलब्धता.
- वरील तीन मापदंडाचा विचार केल्यास विकसित देशांच्या तुलनेत अल्पविकसीत देशांच्या मानवी कल्याणाचा स्तर निम्न आहे.
- 2007 मध्ये कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये पुरुषांकरिता आयुष्यमान 57 वर्ष आणि स्त्रियांकरिता 60 वर्षे होती.
- याउलट उच्च उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये पुरुषांचे सरासरी आयुर्मान 77 वर्षे आणि स्त्रियांचे 82 वर्षे होते. अल्पविकसीत देशांमध्ये रुग्णता विकसित देशांच्या तुलनेत फार जास्त आहे.


Thank you!
shutterstock.com • 95578066